**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २८ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **खासगी उद्योग समुहाच्या कथित लाच प्रकरणावरून संसदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब, नवीन सदस्यांचा शपथविधी संपन्न.**
2. **विधानसभा निवडणूक प्रक्रियेतील वाढीव मतदानाबाबत निवडणूक आयोगाने उत्तर देण्याची काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची मागणी.**
3. **६१ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्रवेशिकेसाठी २७ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ.**
4. **पंचावन्नाव्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - इफ्फीचा आज समारोप.**

---

संसद

संसदेच्या दोन्ही सभागृहात आज कामकाजाला प्रारंभ होताच काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी एका खासगी उद्योगसमुहाच्या कथित लाच प्रकरणाच्या मुद्यावर हौद्यात येत गोंधळ घातला. विरोधी पक्षांनी जोरदार घोषणाबाजी केली, त्यामुळं लोकसभेचं कामकाज सुरुवातीला बारा वाजेपर्यंत स्थगित करण्यात आलं. बारा वाजेनंतर कामकाजाला गोंधळात सुरुवात झाली. याच गोंधळात वक्फ संबंधीच्या संसदीय समितीचा कार्यकाळ वाढवण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानंतर लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेतही काँग्रेस सदस्य प्रमोद तिवारी यांनी नियम २६७ अंतर्गत खासगी उद्योग समुहाच्या कथित लाच प्रकरणावर चर्चेची मागणी केली. विरोधी पक्षांची मागणी फेटाळून लावत राज्यसभा सभापती जगदीप धनकड यांनी सुरुवातीला बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी राज्यसभेचं कामकाज तहकूब केलं. दरम्यान, लोकसभेत आज नव्या सदस्यांचा शपथविधी पार पडला. वायनाडमधून विजयी झालेल्या काँग्रेसच्या प्रियंका गांधी-वाध्रा आणि नांदेडमधून विजयी झालेले रवींद्र चव्हाण यांना लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज सदस्यत्वाची शपथ दिली.

---

नवीन सरकार

महाराष्ट्रातील सत्ता स्थापनेविषयी महायुतीच्या घटक पक्षांच्या नेत्यांची आज नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर संयुक्त बैठक होणार असून त्यानंतर सरकार स्थापनेबद्दल चित्र स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान भाजपचं वरिष्ठ नेतृत्व जो निर्णय घेतील, तो आपल्याला पूर्णपणे मान्य असेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाण्यात पत्रकारांशी बोलतांना स्पष्ट केलं. सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या आमदारांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते गृहमंत्री अमित शहा यांची काल नवी दिल्लीत भेट घेतली. मात्र या बैठकीत सत्ता स्थापनेबाबत चर्चा झाली नसल्याचं शिवसेनेचे नेते केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितलं. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवारही दिल्लीत दाखल झाले असून सत्ता स्थापनेबद्दल खेळीमेळीनं निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही पवार यांनी दिली आहे.

---------------------------------------

नाना पटोले

राज्यात  विधानसभा निवडणूक प्रक्रियेत सुमारे साडे सात टक्के मतदान वाढलं आहे. हे मतदान कसं वाढलं याचं  उत्तर निवडणूक आयोगाने द्यावं, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली आहे.  आम्हाला मतदान प्रक्रियेतच संशय वाटत आहे. निवडणूक आयोगाची भूमिका कुठेतरी संशयास्पद वाटत आहे. प्रसंगी आम्ही न्यायालयात जाऊ. तब्बल ७६ लाख मते वाढली आहेत. ही मते कशी वाढली? ही वाढ कशी झाली, याचं  उत्तर निवडणूक आयोगाने दिलं पाहिजे. सायंकाळी ५.३० नंतर आणि रात्री ११.३० वाजेपर्यंत कुठे मतदान सुरु होते ? याचा व्हिडीओ, फोटो, आयोगाने द्यावा, अशी मागणी पटोले यांनी केली आहे. महाराष्ट्रात झालेल्या मतदान प्रक्रियेबद्दल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांच्या पतीने देखील संशय व्यक्त केला आहे. त्याचा व्हिडीओ पटोले यांनी पत्रकार परिषदेत दाखवला.

---------------------------------------

संजीवन समाधी सोहळा

आळंदीत संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात पार पडला. तीन दिवसांपासून अलंकापुरी आळंदीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले आहेत. संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराजांनी कार्तिक वैद्य त्रयोदशीला अलंकापुरीत समाधी घेतली होती. आज  त्याला ७२८ वर्षं पूर्ण  झाली. त्यानिमित्त ‘श्रीं’ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन

समाधीच्या मुख्य मंदिरावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. सकाळी माऊलींच्या समाधीवर आरती आणि  दुग्धअभिषेक करण्यात आला.

---------------------------------------

ज्योतिबा फुले स्मृतीदिन

थोर समाजसुधारक, स्त्री शिक्षणाचे अग्रणी महात्मा ज्योतिबा फुले यांचा आज स्मृतीदिन आहे.काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महात्मा फुले यांना समाज माध्यमांवरील संदेशातून आदरांजली वाहिली आहे. जोतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त राज्यात सर्वत्र विविध संस्था संघटनांतर्फे त्यांच्या विचार-कार्यावर आधारित विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत्त.

---------------------------------------

लोकसेवा आयोग

रविवार, एक डिसेंबर रोजी होणाऱ्या राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्वपरीक्षेसंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं परीक्षार्थींना नवीन प्रवेश प्रमाणपत्र जारी केलं आहे. आयोगाच्या संकेतस्थळावर यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे.

---------------------------------------

राज्य मराठी चित्रपट प्रवेशिका

६१ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्रवेशिकेला मुदतवाढ देण्यात आली असून निर्मात्यांनी २७ डिसेंबर  पर्यंत प्रवेशिका सादर करण्याचं आवाहन महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी केलं आहे. दिनांक १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत सेन्सॉर झालेल्या मराठी चित्रपटांच्या निर्मात्यांना या पुरस्कारासाठी अर्ज करता येणार आहे. यासाठी आवश्यक असणारी प्रवेशिका महामंडळाच्या filmcitymumbai.org या संकेतस्थळावर तसंच जनसंपर्क विभागात उपलब्ध आहे.

---------------------------------------

इफ्फी समारोप

पंचावन्नाव्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - इफ्फीचा आज समारोप होत आहे. गोवा इथं दिग्दर्शक तथा निर्माते आशुतोष गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली नऊ दिवस चाललेल्या या महोत्सवात ७५ देशांमधले २०० हून अधिक चित्रपट दाखवण्यात आले. सिनेसृष्टीतील दिग्गजांचे मास्टरक्लास, आणि प्रेरणादायी पॅनेल चर्चेसह, अनेक उपक्रम राबवण्यात आले. या समारोप सोहळ्यात विविध पुरस्कारांचं

वितरण होणार आहे. गोव्याच्या डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियम इथं भारतीय चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत होणाऱ्या या समारोपात 'ड्राय सिझन' या चित्रपट दाखवला जाणार आहे.

---------------------------------------

महापरिनिर्वाण दिन विशेष गाड्या

6 डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त नागपूर रेल्वे स्थानकावरून दिनांक चार, पाच आणि सात डिसेंबरला अनुयायांच्या सोयींसाठी आणि अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने विशेष अनारक्षित गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई तसंच दादर ते नागपूर अशा या गाड्या धावणार आहे. या विशेष गाड्यांच्या थांब्यांचा तपशील डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू डॉट इन्क्वायरी डॉट इंडियन रेल या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

---------------------------------------

रुग्णालयांची पाहणी

राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत केंद्रीय आरोग्य विभागाच्या पथकातर्फे अकोला जिल्ह्यातल्या आरोग्य विभागाच्या विविध योजनांसह पायाभूत सुविधांची पाहणी करण्यात येत आहे. या पथकानं काल शासकीय रुग्णालयाला भेटी देऊन सुविधांची पाहणी केली. हे पथक तीन दिवस जिल्ह्यातल्या सर्व शासकीय रुग्णालयांची पाहणी करणार आहे.

---------------------------------------

दिव्यांगजन कार्ड

मध्य रेल्वे तर्फे दिव्यांगजन कार्डच्या ऑनलाइन निर्गमनाची सुरुवात करण्यात आली आहे. divyangjanid.indianrail.gov.in या संकेतस्थाळावर ही सुविधा उपलब्ध आहे. हे प्रगतिशील पाऊलामुळे दिव्यांग प्रवाशांना वेबसाइटवर आवश्यक कागदपत्रांसह थेट अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

---------------------------------------

ग्रामीण जीवनोन्नती अभियान

ग्रामिण भागातील महिलांना उत्पन्नाच साधन निर्माण व्हाव, यासाठी जिल्हा नियोजन समिती मार्फत नाविण्यपूर्ण योजनेंतर्गत महिला बचत गटाच्या माध्यमातून पर्यावरण पुरक अशा 12 हजार 224 सुती कापडाच्या पिशव्या तयार करण्यात आल्या. वर्धा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी महाराष्ट्र जीवनोन्नती अभियाना अंतर्गत पाणी फाऊंडेशन मार्फत कार्यरत असलेल्या आणि उत्कृष्ट अशा

महिला शेतकरी गटाला देवळी तालुक्यातील डिगडोह येथील जिद्दी कापूस उत्पादक शेतकरी महिला गटाला बांधावर जाऊन या सुती कापडाच्या पिशव्यांचं  वितरण केलं. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची वर्धा जिल्ह्यात अंमलबजावणी सुरु आहे. या अभियानांतर्गत एकूण 14 हजार 309 स्वयं सहाय्यता समूह कार्यरत आहेत.

---------------------------------------

'आचार्य देवो भव'

कैलास संगीत ट्रस्ट आणि सप्तक यांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य बिमलेन्दू मुखर्जी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'आचार्य देवो भव' या शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमाचे येत्या 30 नोव्हेंबर रोजी कविकुलगुरू कालिदास ऑडिटोरियम, पर्सिस्टंट सिस्टीम्स इथं  सायंकाळी 6 वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे यांचे गायन आणि अवनींद्र शेवलीकर यांचं सतार वादन होणार आहे.

---------------------------------------

हवामान

विदर्भात गोंदिया जिल्ह्यात ११ पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद गेल्या २४ तासात झाली आहे. नागपूर इथं 11 पूर्णांक 8 अंश  इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं.  उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान १२ ते 14 अंश सेल्सिअस होतं. दरम्यान, अकोला इथं  सर्वाधिक कमाल तापमान 30 पूर्णांक आठ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं.

---------------------------------------